# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-10.05.2026 वार-रविवार

---

**चंद्रशेखरबावनकुळे**

राज्यात येत्या जुलै महिन्यापासून 'लँड टायटलिंग ॲक्ट' लागू होणार आहे; असा कायदा करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असेल, असं प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पुण्यात केलं. भारती विद्यापीठाच्या ६२व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांच्यासह अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. शिक्षणाशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही, राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत, तसंच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे, असं बावनकुळे म्हणाले.
शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचं दादाजी भुसे यांनी अधोरेखित केलं. यावेळी जेष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांना दुसरा डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. भारती विद्यापीठातील संशोधक, प्राध्यापक, कर्मचारी यांचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

**पुरस्कारवितरण**

बालसाहित्यिकांनी लिखाणात विविधता आणून प्रयोग करावेत, मराठी साहित्यात सध्या काय चाललंय, देशात आणि जागतिक पातळीवर काय सुरू आहे, याचा अभ्यास करून लिखाण करणं आवश्यक आहे, असा सल्ला ज्येष्ठ बालसाहित्यिक राजीव तांबे यांनी दिला. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे राज्यस्तरीय वाङमय पुरस्कार प्रदान सोहळा आज पुण्यात पार पडला; त्यावेळी राजीव तांबे बोलत होते.
यावेळी क्षिप्रा शहाणे, प्रिया फुलंब्रीकर, डॉ. प्रतिमा जगताप, डॉ. वर्षा तोडमल, संध्या देवरूखकर, पुंडलिक वझे, संजय काकडे, बाबूराव शिरसाट, डॉ. प्रसन्न दाभोळकर आणि बबन शिंदे यांना विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं.

**चित्रपटमहोत्सव**

बहुरंग संस्थेनं आयोजित केलेल्या १९व्या आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचा समारोप आज पुण्यात झाला. ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या चित्रपट महोत्सवाच्या माध्यमातून आदिवासींचा आवाज, सुख-दुःख-संवेदना यांना बहुरंग संस्थेनं पुढे आणलं हे कौतुकास्पद आहे, असं सबनीस यावेळी म्हणाले. समारोप सोहळ्यात नाशिकचे प्रवीण खोरटे आणि चंद्रपूरचे मारोती टेकाम यांना आदिवासी कला पुरस्काराने गौरवण्यात आलं. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर सुधागड हा मराठी चित्रपट दाखवण्यात आला.

**नसरापूरपुणेनिषेधमोर्चा**

नसरापूर घटनेच्या निषेधार्थ आज पुण्यात विविध संस्था संघटनांच्या वतीनं मुक मोर्चा काढण्यात येत आहे. या प्रकरणातील आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशा आशयाचे फलक घेत आंदोलनकर्त्यांनी बालगंधर्व रंगमंदिर परिसरातून हा निषेध मोर्चा काढला.

**खरातप्रकरण**

लैंगिक अत्याचार प्रकरणी अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणी, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची आज नाशिकमध्ये विशेष तपास पथकानं चौकशी केली. यावेळी रुपाली चाकणकर आणि खरात यांचे आर्थिक संबंध, खासगी पतसंस्थांमधली खाती, खरात याच्या धार्मिक संस्थेमधलं चाकणकर यांचं सदस्यत्व, या आणि इतर मुद्द्यांवर विशेष तपास पथकानं चौकशी केली.

**पिंपरीचिंचवड**

मंत्रालयातील 'डिजी प्रवेश' प्रणालीच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने 'स्वागतम ई-पास' प्रणाली सुरू केली आहे. या नव्या सुविधेमुळे नागरिकांना आता घरबसल्या महापालिका कार्यालयात प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. या सुविधेसाठी नागरिकांना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'स्वागतम ई-पास' लिंकद्वारे नोंदणी करावी लागणार आहे.

**सांगलीआकाशवाणी90वर्ष**

आकाशवाणीच्या नव्वदाव्या वर्षपूर्ती निमित्त सध्या देशभरातील आकाशवाणी केंद्रातर्फे विविध कार्यक्रम सादर होत आहेत. या पार्श्वभूमीवर काल आकाशवाणी सांगली केंद्रातर्फे;चांदणे शब्द स्वरांचे; हा सुगम संगीताचा विशेष कार्यक्रम पार पडला. यावेळी आकाशवाणी सांगलीचे कार्यक्रम प्रमुख श्रीनिवास जरंडीकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**स्कायमेट-मुंबई**

अंदमानमध्ये यंदा मोसमी पावसाचं आगमन वेळेच्या आधी होण्याची शक्यता स्कायमेट या खाजगी हवामानशास्त्र संस्थेनं वर्तवली आहे. येत्या १२ आणि १३ मे रोजी विषवृत्तीय प्रदेशाजवळ आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे, त्यामुळे मोसमी पाऊस नेहमीपेक्षा लवकर येणार असल्याचा अंदाज आहे. यंदा १४ मे ते २० मे दरम्यान अंदमानात पाऊस येण्याचा अंदाज होता त्या ऐवजी तो काही दिवस आधीच येण्याची शक्यता स्कायमेटनं वर्तवली आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज दुपारनंतर वातावरण काहीसं ढगाळ झालं; आज कमाल तापमान 41 तर किमान तापमान 21 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित घट होण्याचा अंदाज असून दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**